तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharasthra.gov.in

**परिपत्रक**

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ ३८८२
दिनांक: 1 SEP 2017

**विषय:- शैक्षणिक वर्ष 2017-18 मधील प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. तसेच प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. तसेच थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थामध्ये संस्थास्तरावर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी व संस्थास्तरावर प्रवेश घेण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत...**

**संदर्भ:- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक 10/एडीएम/पदविका/2017/3854 दि. 29.8.2017. व परिपत्रक क्रमांक 10/एडीएम/पदविका/2017/3855 दि. 29.8.2017.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधिन सूचनेच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. तसेच प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. तसेच थेट द्वितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानीत संस्थांमध्ये संस्थास्तरीय प्रवेश प्रकियेकरीता विद्यार्थ्यांना रजिस्ट्रेशन करण्यासाठी दि.३०.०८.२०१७ पर्यंत व संस्थास्तरीय प्रवेश घेण्याकरीता दि. ३१.०८.२०१७ पर्यंत मुदत देण्यात आली होती.

तथापी उपरोक्त पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विहीत कालावधीत नोंदणी करू शकले नाहीत किंवा अर्धवट नोंदणी करून सुविधा केंद्रावर जाऊन कागदपत्र पडताळणी करू शकले नाहीत. तसेच अतिवृष्टीमुळे काही विद्यार्थी सुविधा केंद्रावर पोहचू शकले नाहीत व त्यामुळे विद्यार्थी विनाअनुदानीत संस्थांमध्ये संस्थास्तरीय प्रवेश घेऊ शकले नाहीत. अशा सर्व पात्र इच्छुक विद्यार्थ्यांचे विनाअनुदानीत संस्थांमध्ये संस्थास्तरीय प्रवेश करण्याकरीता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितास्तव दि.०५.०९.२०१७ पर्यंत सुविधा केंद्रावर (FC) अर्ज विक्री,नोंदणी, कागदपत्र पडताळणी व अर्ज कन्फर्म करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे. वरील नमुद उमेदवारांकडुन संबंधित सुविधा केंद्रानी अर्ज विक्रीची फी रोख स्वरुपात घेऊन यापुर्वी केलेल्या प्रकियेप्रमाणे सदर अर्ज विक्रीची फी सीईटी सेलकडे जमा करावी.

अशा प्रकारे दि. ०५.०९.२०१७ पर्यंत सुविधा केंद्रांवर अर्ज कन्फर्म केलेले विद्यार्थी विनाअनुदानीत संस्थांमध्ये संस्थास्तरीय प्रवेश घेण्यासाठी पात्र ठरतील. विनाअनुदानीत संस्था अशा इच्छुक विद्यार्थ्यांचे संस्थास्तरीय प्रवेश दि.०५.०९.२०१७ पर्यंत करु शकतील. तसेच प्रवेश झालेल्या संस्थेने प्रति विद्यार्थी रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) रोख प्रोसेसिंग फी घेण्यात यावी. तद्नंतर आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे नावे (विद्यार्थ्यांच्या Excel मधील इथ्यंभूत माहितीची यादीसह) त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचेकडे पाठवतील व त्यांची योग्य ती नोंद ठेवुन त्यांची यादी विभागीय कार्यालयामार्फत पडताळणी करुन या संचालनालयास पाठवतील.

तसेच सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित पदविका संस्थांमधील संस्थास्तरीय प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर (Uploading Date) दि. ०७.०९.२०१७ पर्यंत भरण्यात यावी.

(चंद्रशेखर ओक ) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**

1. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, बांद्रा (पुर्व), मुंबई
2. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
3. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई.
4. प्राचार्य, सर्व पुर्ण वेळ पदविका संस्था
5. प्राचार्य, सर्व सुविधा केंद्र
6. निवडनस्ती.

C:\Users\desk10\Desktop\additional opportunity for passing students.docx